(22)

*Power of Knowledge Peer Review Journal, Volume: I, Issue: III Oct. to Dec. 2023 ISSN 2320-4494 Impact factor 2.7286*

RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

**An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal**

**Editor**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**

**● Mailing Address ●**
**Prof. Dr. Sadashiv H. Sarkate**
**Editor : POWER OF KNOWLEDGE**
**Head of Dept. Marathi**
Art's, Sci. & Com. College, Shivajinagar, Gadhi, Tq. Georai Dist. Beed-431 143 (M.S.)
Cell. No. 9420029115 / 7875827115
Email : powerofknowledge3@gmail.com /
shsarkate@gmail.com

**Price : Rs. 300/-**
**Annual Subscription: Rs. 1000/-**

Scanned with OKEN Scanner

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

***Volume I, Issue III***
***Oct. to Dec. 2023***
Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
E-mail : Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Vice Chancellor M.G.M.U. Aurangabad & Ex.Vice Chancellor Y.C.M.U. Nasik & Professor of Mass Communication & Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr.Pratibha Aher**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Principal Gautam Patil**
Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Prof. Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr B A M U Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B A M U Aurangbad

**Dr.D.P.Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L B S College, Partur Dist Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr B A M U Aurangbad

**Dr. Vitthal S. Jadhav**
Dept. of Pub Administration,
Kalikadevi College, Shirur (K ), Dist Beed

**Dr. Kadam Mangal S.**
PG Dept of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr B A M U Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U P)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College, Mantha
Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science College,
Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Madhukar Jadhav**
Shri. Vyankatesh mahavidyalya,
Deulgaonraja, Buldana

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr B A M U Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Chokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**

**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**

**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

Scanned with OKEN Scanner

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Importance of Makkala Gramasabha in Effective Implementation of Child Rights | Bhagirathi N Dr. BP Shivalingappa | 1-5 |
| 2 | "Exploring Language Through Fantasy In Selected Novels of Ursula K Le Guin" | Dr. Sunil Raosaheb Raut | 6-12 |
| 3 | Ethenobotanical Study of Some Tree Medicinal Plants in Dharashiv District of Marathwada, Maharashtra. | Ram S. Bajgire | 13-17 |
| 4 | New trends, challenges and issues in research methodology | Dr. Manik S. Waghmare | 18-23 |
| 5 | Ethnomedical Knowledge of Plants used by the Tribal People of " Sanjivani Bet "in Wadwal Nagnath of Latur District, Maharashtra, India. | Ram S. Bajgire | 24-29 |
| 6 | तथागत सिद्धार्थ गौतम बुद्धांना समजून घेताना... | प्रा.डॉ. चंद्रकांत वाघमारे | 30-36 |
| 7 | सदगुरू अच्युताश्रमस्वामी चरित्र लीळामृत-एक- चिंतन(भाग-२) | प्रा. डॉ. मेधा गोसावी | 37-45 |
| 8 | शेतीनिष्ठ जीवन आणि मराठी ग्रामीण कविता | डॉ. अरूण कोळी | 46-50 |
| 9 | पारंपारिक स्त्रीदास्य आणि स्त्री स्वातंत्र्य | प्रा.डॉ. श्रीहरी रामराव धोंड | 51-54 |
| 10 | सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणातील विशेष अहवाल (Special Reports) : १) विशेष अहवाल (प्रशासकीय), २) विनिर्दिष्ट अहवाल | प्राचार्य डॉ. रमेश दगु दरेकर स्वाती विश्वनाथ कोंढाळकर | 55-61 |
| 11 | नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील शैक्षणिक जीवनाचे चित्रण | प्रा.डॉ.राजीव वैजनाथराव यशवंते | 62-66 |
| 12 | शरतचन्द्र एवं प्रेमचन्द की कहानियों में नारी चरित्र:एक तुलनात्मक अध्ययन | प्रा. रेणुका चव्हाण | 67-72 |
| 13 | भारताच्या राजकारणाचे स्वरुप आणि त्यापुढील अडचणी | सहा.प्रा.विकास नानासाहेब बेलगे | 73-81 |
| 14 | भारतीय राजकारण आणि दहशतवाद | डॉ.ज्योती सुभाषराव धायगुडे कु.ससाणे शिल्पा महादेव | 82-87 |
| 15 | एकविसाव्या शतकात भारतीय संघराज्यासमोरील आव्हाने | प्रा.सिध्दार्थ मुंगे | 88-94 |
| 16 | स्त्रियांच्या मानवी हक्कांच्या घटनात्मक संरक्षणासंबंधी भारतातील प्रमुख कायदे | सुधीर रामचंद्र धोंगडे डॉ. प्रदीप महादेव जगताप | 95-98 |
| 17 | महादजी शिंदे यांच्या सरदार की वजहागिरीसाठी संघर्ष | डॉ.नवनाथ दत्तात्रय वाजगे | 99-105 |


Scanned with OKEN Scanner

# महादजी शिंदे यांच्या सरदार की वजहागिरीसाठी संघर्ष

**डॉ.नवनाथ दत्तात्रय वाजगे**
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभागप्रमुख
सावित्रीबाई कला महाविद्यालय, पिंपळगाव पिसा, ता.श्रीगोंदा ज.अहमदनगर

**सारांश**

*महादजी शिंदे व पेशवे यांच्यात करार होऊन महादजींच्या सरदारकीचा प्रश्न सुटला. राणोजी शिंदे व त्यांचे पुत्र यांच्या मृत्यूनंतर सरदारकी कोणाला द्यायची असा प्रश्न निर्माण झाला होता. राणोजी शिंदे यांचे तीनही पुत्र आणि नातू जनकोजी पानिपत युद्धापर्यंत उत्तरेत मृत्यू पावले होते. दुसरी पत्नी चीमाबाईपासून झालेल्या पुत्रांपैकी तुकोजी शिंदे यांचा देखील मृत्यू झाला होता.आता केवळ महाडजी शिंदे हेच केवळ हयात होते. अशा वेळी या घराण्यातील सरदारकीचे हक्क महादजी शिंदे यांना मिळायला हवे होते. परंतु राघोबादादांच्या हस्तक्षेपामुळे पेशव्यांच्या घरातील गृहकलहाप्रमाणेच शिंदे घराण्यात देखील गृहकलह सुरू झाला. माधवराव पेशव्यांविरुद्धच्या संघर्षात आपल्याला राजकारणात मदत करील असा माणूस राघोबा दादांना हवा होता. म्हणून त्यांनी मानाजीचा पक्ष उचलून धरला.*

**प्रस्तावना**

इसवी सन 1763 मध्ये जानोजी व निजाम यांनी पुण्यावर स्वारी केली. निजामावर वचक बसविण्यासाठी माधवराव पेशव्यांनी उज्जैन येथे असलेल्या महादजी शिंदे यांना वऱ्हाड ताब्यात घेण्यास सांगितले. ही बातमी जानोजीला समजताच महादजी शिंद्यांच्या भीतीने तो पेशव्यांना येऊन मिळाला. त्यामुळे पेशव्यांना महाद्जींच्या मदतीची गरज भासली नाही. परंतु महादजी शिंदे दक्षिणेत असल्याने राघोबादादा मात्र अस्वस्थ झाले. पेशव्यांनी निजामाशी तह केला. त्यानंतर महादजी व पेशवे यांची कायगाव टोके येथे भेट झाली. यावेळी महादजी शिंदे यांची फौज पाहून माधवराव पेशव्यांना आनंद झाला. तेथून ते दोघेही पुण्यात आले. पुण्यातून महादजी शिंद्यांनी पेशव्यांचा निरोप घेतला व ते श्रीगोंद्याला गेले.[1]

**महादजी शिंदे यांचा सरदार की वजहागिरीसाठी संघर्ष**

पुढील काळात देखील महादजी शिंद्यांच्या सरदारकीसाठी संघर्ष चालूच होता. 19 सप्टेंबर 1763 च्या गंगाधर यशवंत यांनी लिहिलेल्या पत्रावरून याची कल्पना येते. या पत्रात तो म्हणतो की, महादजी शिंदे यांनी पेशव्यांच्या भेटीस यावे म्हणून पत्रे पाठविली. परंतु ते आले नाहीत. मात्र सखूबाई शिंदे पेशव्यांना भेटल्या. त्यानंतर



Scanned with OKEN Scanner

महादजी शिंदे देखील भेटले. पेशव्यांनी महादजी शिंयांना सखूबाईची कृपा संपादन करण्यास सांगितले. परंतु महादजींना ते पटले नाही. त्यामुळे सखूबाई शिंदे यांच्या सल्ल्यानुसार मानाजी शिंदे (फाकडे ) यांना सरदारकीची वस्त्र देण्यात आली. महादाजी गोविंद (काकींर्डे) यांची कारभारी म्हणून नियुक्ती करण्यात आली.[2]

महादजी शिंदे यांना 400 फौजेची सरदारकी देण्यात येत होती. परंतु ही गोष्ट अमान्य करून ते उठून गेले. सखूबाई शिंदेंचा त्रास देखवत नाही म्हणून त्यांच्या आग्रहावरून मानाजी शिंदेंना सरदारकी देण्यात आली. रागावून महादजी शिंदे उज्जैनला आले.[3] पेशव्यांची मर्जी संपादून दौलतीचा ताबा आपल्याला मिळावा म्हणून महादजींनी खूप प्रयत्न केले. परंतु राघोबादादाने महादजींना दूर करून केदारजी शिंदे यांच्या नावे आठ लाखाचा नजराणा देऊन सनदा देण्याचा निर्णय घेतला. अच्युतराव गणेश याला दिवाणगिरी दिली. दादाचा हा निर्णय माधवराव पेशव्यांना मान्य नसल्याने त्यांनी 15 डिसेंबर 1763 रोजी एक स्वतंत्र सनद महादजींना करून दिली. परंतु ही व्यवस्था टिकली नाही.अच्युतराव गणेश व बाजी नरसिंह या दोन कारभाऱ्यांचे आपापसात पटत नव्हते. त्यामुळे ही व्यवस्था टिकली नाही.[4]

सर्व बाजूंनी घाबरून सोडले आहे. आमच्याकडील माणसे फितवली आहेत. त्यांना आमच्याकडे येवू देत नाहीत. आमच्या माणसांची शेते ताब्यात घेतली. एक दोन ब्राह्मण जवळ होते. त्यांनाही उपद्रव सुरूच आहे. आमची अन्न वस्त्राची अडचण झाली आहे. आमच्यावर ईश्वराने अवकृपा केल्यामुळे पती ( जायाजी शिंदे ) युद्धात मृत्यू पावले. आमच्यावर दुखाचे पर्वत कोसळले आहेत. [5] कोठेही आधार राहिलेला नाही. हे सर्व दु:ख पेलत नसताना महादजी पाठीमागे लागले आहेत. आता फक्त पेशव्यांचा भरवसा राहिला आहे. परंतु ते देखील परामर्श घेत नाहीत. या गोष्टीला पर्याय नाही. साहेबांना सद्यस्थिती सांगायची म्हटली तर आम्ही चोर आहोत अशी गत झाली आहे......साहेबांच्या मनात आमची विपत्ति कराची असेल तर तसे कळवावे. विष प्राशून आम्ही प्राण देऊ. दुसरा पर्याय नाही. हा जाच आम्हाला सोसवत नाही. आमची जहागिरी पेशव्यांनी त्यांच्या हातात दिली. चार महिन्यांपासून ते श्रीगोंद्यात येऊन बसले आहेत. एकही राऊत आमच्याजवळ शिल्लक ठेवला नाही.आमच्या पागेचा बंदोबस्त नाही. कोणत्याही गोष्टीची तिळमात्र व्यवस्था नाही. सर्व बाजूंनी बखेडा झाला आहे. कुणाला तरी पाठवून परामर्श करावा. पुढील काळात आमच्या संसारासाठी काही बंदोबस्त करून दिला तरच आमची व्यवस्था होईल. महादजींच्या जाचापासून आमची सोडणूक व्हावी.[6]



Scanned with OKEN Scanner

मानाजी शिंदे यांची नेमणूक सरदारकीवर झाल्यामुळे महादजी शिंदे संतापले. जून 1764 मध्ये माळव्यात निघून गेले. जाताना त्यांनी राघोबा दादांची आज्ञा घेतली नाही. त्यामुळे महादजी शिंदे यांचे पारिपत्य करावे अशी आज्ञा राघोबा दादाने अशीरगडच्या किल्लेदारांना दिली. परंतू या विरोधाची पर्वा न करता महादजी शिंदे उज्जैनला पोहोचले. पुढील काळात उत्तर भारतातून त्यांनी खंडणी गोळा करण्यास सुरुवात केली. राघोबादादाला आज्ञा सोडण्याशिवाय काहीच करणे शक्य झाले नाही. पुढे इसवी सन 1766 मध्ये राघोबादादा जेव्हा उत्तरेत स्वारीवर गेले तेव्हा महादजी शिंयांनी त्यांच्या आज्ञेत कामे केली.[7]

उत्तर भारतात महादजी व केदारजी यांनी मात्र आपली छाप चांगलीच बसवली होती. सैन्याला व सावकारांना महादजींबद्दल विश्वास वाटू लागला. या काळात उत्तर भारतात खंडण्या वसूल करून महादजींनी आपली पैशाची गरज भागवली.[8] महादजी शिंदे व केदारजी शिंदे यांच्यात सुरूवातीला सख्य होते. परंतू मे 1767 च्या दरम्यान फूट पडून केदारजी यांनी महादजी शिंदेंचा पक्ष सोडला. केदारजी दोन तीन हजार फौज घेऊन अच्युतराव कारभारी यांच्यासह राघोबदादांना जाऊन मिळाला. त्यामुळे शिंदे घराण्याच्या सरदारकीचे हक्क केदारजीला देण्यात आले. केदारजीला सरदारकी दिली त्याबदल्यात नजर म्हणून काही रक्कम मिळावी ही देखील अपेक्षा यामागे होती.[9]

डिसेंबर 1767 मध्ये माधवराव पेशवे व राघोबादादा यांच्यामधील अंतस्थ कलह आनंदवल्ली येथे समझौता होऊन मिटला. परंतु यावेळेपर्यंत महादजी शिंयांच्या सरदारकीचा प्रश्न मात्र मिटला नव्हता. महादजी शिंदे यांना उत्तरेतून दक्षिणेत बोलावले होते. परंतू ते न आल्यामुळे माधवराव पेशव्यांनी निर्णय घ्यायचे ठरवले .[9] डिसेंबर 1767 रोजी चिंतो विठ्ठल यास पाठविलेल्या पत्रात ते लिहितात की, महादजी शिंदेंच्या येण्याची मुदत झाली परंतू ते अजूनही उज्जैनीस आहेत. त्यामुळे सरकारी काम थांबते. त्यामुळे बाजी नरसिंह याला शिंयांची दिवाणगिरी देऊन सरदारकीचा बंदोबस्त केला आहे".[10]हा निर्णय महादजी शिंयांना पसंत पडला नाही. त्यांनी माधवराव पेशव्यांना लिहिले की," आमच्या येण्याविषयी पाच सात पत्रे आली. त्यामुळे जमेल तसे करून आम्ही बुरहानपूरास आलो. तिथे कळाले की बाजी नरसिंह व राघोराम यांनी 10 लक्ष हजार नजर देण्याचे कबूल केले आहे. पेशव्यांनी ही दौलत दुसऱ्याच्या हातात दिल्यास आम्हाला अडचण नाही. परंतू आम्ही पेशव्यांच्या आज्ञेप्रमाणे देशी येत असून देखील असा प्रकार घडू नये.[11]

महादजी शिंद्यांच्या पत्रामुळे ते देशी येण्याच्या अगोदरच माधवराव पेशव्यांनी त्यांच्या सरदारकीचा निर्णय घेतला. केदारजीची सरदारकी काढून घेण्यात आली. महादजी शिंदेंना 5 लाख नजराण्याच्या मोबदल्यात सरदारकीची वस्त्रे देण्याचा निर्णय झाला. बाजी नरसिंह याला महादजी शिंद्यांची दिवाणगिरी देण्यात आली. त्याचबरोबर 5 लाख रूपयांचा करार केला. होळकर व शिंद्यांनी एका विचाराने रहावे अशी आज्ञा केली. हा निर्णय घेण्यापूर्वी कर्नाटकास स्वारीवर जाताना माधवराव पेशव्यांच्या मनात विचार आला की, सिंद्यांची सरदारी मातबर. मराठ्याशिवाय सरदारकीचा चक बसणार नाही. महादजी शिंद्यासी सरदारकी द्यावी व कारभार नारो शंकरास द्यावा. त्यांनी नारो शंकरास या संदर्भात विचारणा केली. परंतू नारो शंकरानी नाराज होऊन निरोप पाठविला की ,"मी यापायीचाळीस लक्ष रूपयांचा कर्जदार झालो आहे. माझी कर्जाची व्यवस्था करून मग हे काम इतरांना सांगावे. या पार्श्वभूमीवर महादजी शिंद्यांना सरदारकीची वस्त्रे मिळाली. मलगावला महादजी शिंदे व पेशव्यांची भेट झाली. माधवराव पेशवे यांनी स्वतः सामोरे जाऊन महादजी शिंदे यांचे स्वागत केले आणि वस्त्रभूषणे दिली. महादजी शिंदे यांचे प्रस्थ पाहून पेशव्यांना समाधान वाटले. माधवरावांनी बरोबरीच्या नात्याने महादजींचा सन्मान करून दूरदृष्टीने विचार करत आपल्याजवळील फौज देखील शिंद्यांच्या बरोबर दिली. आपल्या घर व पागेसह माधवराव मलगावस गेले.[12]

महादजी शिंद्यांना सरदारकी दिल्यामुळे नारो शंकर नाराज होऊन खानदेश प्रांतात जाऊन राहिले. महादजी शिंद्यांनी त्यांना आपल्याबरोबर येण्यास विनंती केली पण ते गेले नाहीत. हे वृत्त माधवराव पेशव्यांना समजल्यावर ते देखील नाराज झाले. महादजी शिंदे यांनी देखील नारो शंकर यांच्याविषयी पेशव्यांकडे नाराजी व्यक्त केली. त्यामुळे पेशव्यांची नाराजी काढण्यासाठी नारो शंकराने अच्युत गणेश यांना पुण्यास पाठविले.[13]

राघोबादादा विरुद्धच्या संघर्षात महादजी शिंदे यांचा आपल्याला उपयोग होईल अशी माधवराव पेशव्यांची अपेक्षा होती. महदजी शिंदेना सरदारकी दिल्यामुळे राघोबा दादाने केदारजीला आपल्याजवळ आणून ठेवले. पुढे राघोबादादा व माधवराव पेशवे यांच्यात संघर्ष उद्भवला. त्यावेळी महादजींनी पेशव्यांची बाजू चांगली सांभाळली. या युद्धात राघोबादादाचा पराभव झाला. केदारजी पळून गेला. दादा व केदारजीचे सर्व साक्षीदार पकडले गेले. त्यांना माधवरावाने शिक्षा केल्या. केदारजीला मार देऊन महादजींच्या हवाली केले. त्याची सरदारकी देखील रद्द केली.[14]

महादजी शिंदे यांना सरदारकीची वस्त्रे मिळाल्यामुळे त्यांनी आपली जहागिरीची व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला. त्यांना सरदारकी मिळाल्यामुळे निंबाबाई , सखूबाई या



Scanned with OKEN Scanner

नाराज झाल्या. महादजी शिंदे यांना सरदारकी देण्यास त्या प्रतिकूल होत्या. परंतू माधवराव पेशव्यांना सरदारकी दिल्यामुळे त्यांचे काहीच चालले नाही.[15] महादजी शिंद्यांनी श्रीगोंद्यास जाऊन सखूबाईची समजूत काढली. तिच्या नेमणूकीचा करार स्वाहस्ताक्षराने करून दिला. यानंतर केदारजीचा उल्लेख पुढील काळात येत नाही.[16]

**महादजी शिंदे व पेशवे यांच्यातील करार**

पुरुषोत्तम मावजी व दत्तात्रय बळवंत पारसनीस यांनी संपादित केलेल्या 'तह, करार आणि सनदा पत्रे' या ग्रंथात पेशवे व महादजी शिंदे यांच्यात झालेला करार प्रसिद्ध केला आहे. या कारारानुसार महादजी शिंदे यांच्या जहागिरीची व्यवस्था पुढीलप्रमाणे झालेली दिसते. श्रीगोंद्यातील जहागीर संबंधाने त्यात पुढील कलमे आलेली आहेत.

1.कलम : मुले मनुष्ये ठेवावयांसी देशी जागा नाही. हिंदुस्थानात स्वारीस जाणे. मुले मनुष्ये देसी असतात. वलकुवलीस रहावयाकरिता जागा चांगली असावी. त्यास देशी कृपा अरूण रहावयायोग्य स्थळ सरंजाम सुद्धा द्यावे.[17]

करार : तूर्त राहावयास पेडगाव तुम्हाकडे आहेच. त्यातच गुदरणी करावी. पुढे श्री कृपेने सर्वही अनुकूल होऊन येईल. येनेप्रमाणे करार.[18]

2.कलम : पाच लक्ष रुपये सरकारांत द्यावे असा करार आहे. त्यास सरदारी वोढगस्त , रुपये आले नाही. हे सर्व स्वामीस विदितच आहे. तूर्त वोढीचा प्रकार जाणोन माफ करावे. हिंदुस्थानात गेल्यावरी पांचशे काय, सरदारीचा खर्च चालून जे राहील ते सर्व धन्याचेच आहे.

करारः सालगुदस्ता हिंदुस्थानात तुमचे जाणे न जाल्यामुळे वायदाही चुकला. हल्ली तुमचे वोढीमुळे तूर्त द्यावयास महकुफ केले आहेत. हिंदुस्थानात गेल्यावरी काळजी धरून ,आधी ऐवजाची तरतूद करून , साहा महिन्याअलीकडे ऐवज पाठवून द्यावा. येणे प्रमाणे करार.

3. कलमः यादी श्रीमंत राजश्री दादासाहेब यांजपाशी फौज दोन हजार ठेवावी लागते. त्याची खर्चाची बेगमी सालींना दरस्वारी सेरा रुपये 300 प्रमाणे साहा लाख होतात. त्याची नेमणूक करून देविली पाहिजे.

करार : माहाद्जी शिंदे यांनी दोन हजार फौज राजश्री दादासाहेबांकडील बंदोबस्तात नेहमी ठेवावी. याप्रमाणे करार.[20]

वरील यादीतील पहिल्या कलमानुसार महादजी शिंदे यांनी मुले-मनुष्ये देशी ठेवण्यासाठी , त्यांच्या निवासासाठी चांगल्या स्थळाची मागणी केली होती. तसेच त्यांच्या खर्चासाठी सरंजाम द्यावा अशी मागणी केली होती. त्यावर पेडगावची जहागिरी



Scanned with OKEN Scanner

शिंदांकडे अगोदरपासून असून त्यातच त्यांनी गुजराण करावी असा करार केला आहे. दुसऱ्या कलमात महादजी शिंदे यांनी सरदारी ओढगस्त असल्यामुळे 5 लक्ष रुपये माफ करावेत. हिंदुस्थानात गेल्यावर सरदारकीचा खर्च भागवून जे पैसे उरतील ते सरकारकडे पाठवून देवू अशी विनंती केली. यावर पेशव्यांनी मागील वर्षाचा वायदा चुकलेला असून सध्या ओढगस्तीची परिस्थिती असल्यामुळे तूर्त द्यावयाचे पैसे माफ होतील.

अशा प्रकारे महाजी शिंदे व पेशवे यांच्यात करार होऊन महादजींच्या सरदारकीचा प्रश्न सुटला. राणोजी शिंदे व त्यांचे पुत्र यांच्या मृत्यूनंतर सरदारकी कोणाला द्यायची असा प्रश्न निर्माण झाला. राणोजी शिंदे यांचे तीनही पुत्र आणि नातू जनकोजी पानिपतपर्यंत उत्तरेत मृत्यू पावले होते. दुसरी पत्नी चिमाबाईपासून झालेल्या पुत्रांपैकी तुकोजी शिंदे यांचा देखील मृत्यू झाला होता.आता केवळ महाडजी शिंदे हेच केवळ हयात होते. अशा वेळी या घराण्यातील सरदारकीचे हक्क महादजी शिंदे यांना मिळायला हवे होते. परंतु राघोबा दादांच्या हस्तक्षेपामुळे पेशव्यांच्या घरातील गृह कलहाप्रमाणेच शिंदे घराण्यात देखील गृहकलह सुरु झाला. माधवराव पेशव्यांविरुद्धच्या संघर्षात आपल्याला राजकारणात मदत करील असा माणूस राघोबादादांना हवा होता. म्हणून त्यांनी मानाजीचा पक्ष उचलून धरला. मानाजी शिंदे हा साबाजी शिंदे यांचा नातू असून साबाजी शिंदेंनी अटकेपार झेंडे लावण्यास मदत केली होती. मानाजी हा पराक्रमी असून तो नाना फडणीसांना देखील विरोध करीत असे. मराठेशाहीच्या इतिहासात तो फाकडे या नावाने देखील प्रसिद्ध होता [21]

राघोबादादाने 1764 मध्ये मानाजीला सरदारकी दिली. त्या वेळेपासून मानाजी हा राघोबादादाचा एकनिष्ठ सेवक बनला. या सर्व संघर्षात सखूबाई यांनी देखील मानाजीला अनुमती दाखवून राघोबाच्या निर्णयास पाठिंबा दिला. महादजी व सखूबाई यांचे पटत नसल्याने सखूबाईनेच महादजी ऐवजी मानाजीला मानाची वस्त्रे देण्याचा सल्ला दिला. त्यानुसार मानाजीला सरदारकीची वस्त्रे देण्यात आली.[22] परंतु महादजी शिंदे यांचा सरदारकी मिळविण्याचा प्रश्न मात्र सुटला नाही. पुढील काळात उत्तर भारतात जाऊन त्यांनी आपला जम बसवला. आपल्या सैन्याची तरतूद खंडण्या वसूल करून केली. उत्तर भारतात शिंदे घराण्याचे प्रस्थ निर्माण झाले. पुढे राघोबादादा व माधवराव पेशवे यांच्यातील गृहकलह चालूच राहिला.

निष्कर्ष

माधवराव पेशवे यांनी महादजी शिंदे यांचे महत्व ओळखून त्यांना सरदारकीचे हक्क दिले. पुढील काळात महादजी शिंदांनी पेशव्यांना चांगली साथ दिली. कालांतराने राघोबादादाचा पक्ष कमजोर पडला. माधवराव पेशव्यांनी त्यावर मात केली. या काळात



Scanned with OKEN Scanner

महादजी शिंदे यांचे प्रतिस्पर्धी केदारजी व मानाजी हे देखील दूर झाले. पेशवे व महादजी यांच्यात करार होऊन उत्तर भारतातील आपल्या कार्यक्षेत्रावर महादजी शिंदे यांना आपले लक्ष्य स्थिर करणे शक्य झाले. इथून पुढचा महादजी शिंदे यांचा उत्तर भारतातील इतिहास हा पराक्रमाचा आणि मुत्सद्देगिरीचा आहे.

**संदर्भ व तळटीपा**


१. गो.स.सरदेसाई , मराठी रियासत , खंड -५ , पृ.२१४.

२. गो.स.सरदेसाई , पेशवे दप्तरातून निवडलेले कागद , खंड २९ , लेखांक ४८ , पृ. ४३

३. कित्ता , पृ. १४४ .

४. गो.स.सरदेसाई , पेशवे दप्तरातून निवडलेले कागद , खंड २९ , लेखांक ७८ .

५. गो.स.सरदेसाई , पेशवे दप्तरातून निवडलेले कागद, खंड २९, पुणे ,लेखांक ७८

६.गो.स.सरदेसाई , पेशवे दप्तरातून निवडलेले कागद , खंड २९ ,लेखांक ५३ , पृ.४८ .

७. गो.स.सरदेसाई , मराठी रियासत , खंड -६ , पृ.१९५.

८. कित्ता , पृ. १९७.

९. गो.स.सरदेसाई , पेशवे दप्तरातून निवडलेले कागद , खंड २९ , पृ.४८ .

१०. गो.स.सरदेसाई , मराठी रियासत , खंड -६ , पृ.२२०.

११. कित्ता , पृ. २२१.

१२.ग. ह. खरे ( संपा.) , हिंगणे दफ्तर (भाग २ ) , भा.इ.सं.मं. स्वीय ग्रंथमाला,क्र.७० , लेखांक ४९, पृ.४५.

१३. कित्ता , पृ. ४६.

१४. गो.स.सरदेसाई , मराठी रियासत , खंड -५ , पृ.२२२.

१५. ग. ह. खरे ( संपा.) , हिंगणे दफ्तर भाग २,पूर्वोक्त , पृ.४७.

१६. कित्ता , पृ. ४६.

१७. पुरुषोत्तम मावजी व दत्तात्रय पारसनीस ,( संपा. ) , तह ,करार आणि सनदा पत्रे , पृ. १५३.

१८. कित्ता , पृ. १५४.

१९. कित्ता , पृ. १५५.

२०. . गो.स.सरदेसाई , मराठी रियासत , खंड -५ , पृ.२२३.

२१. . गो.स.सरदेसाई , मराठी रियासत , खंड -६ , पृ.१९१.

२२. ऐतिहासिक संकीर्ण साहित्य , खंड १६ , त्रैमासिक , भा.इ.सं.मं. स्वीय ग्रंथमाला,पृ. ९७.


◆◆◆



Scanned with OKEN Scanner